MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी शांत पद्धतीने ए बी फॉम केला दाखल

केज (प्रतिनिधी)

केज विधानसभा राखीव मतदार संघाची निवडणूक रणधुमाळी सध्या चालू असून, अनेकांनी आपले ए.बी. फॉम के ज विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले आहेत, माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी शरद पवार गटाकडून ए.बी. फॉम दाखल केला आहे. त्यामुळे अनेक प्रतिस्पर्धी यांच्या झोपा उडाल्या आहेत.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -४३ | बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -43 | WEDNESDAY DT.30 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# डॉ योगेश क्षीरसागरांच्या बीड विधानसभेतील उमेदवारीने अजित पवारांची बीड जिल्ह्यात ताकत वाढली

डॉ सारीकाताई क्षीरसागराची अनेक बीड शहरासह ग्रामीण भागातील दौऱ्याची मेहनत कामी आली
डॉ योगेश क्षीरसागराना सारीका वहिनीची महिला टीम मोठ्या मताधिक्याने विजयी वाटचालीसाठी महत्त्वाची भूमिका
डॉ योगेश क्षीरसागरानी शून्यातून विश्व निर्माण केल विरोधकांची धाकधुक सूरूच.
अजित पवारांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीला रोखण्यासाठी डॉ योगेश क्षीरसागर उमेदवार दिल्यामुळे लढाईत आता बीड ची जागा अजित पवार जिंकण्याची दाट शक्यता आहे.
डॉ योगेश क्षीरसागराच्या बीड मतदार संघात यांच्या उमेदवारीने विरोधक घायाळ
२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांच्या खंबीर पाठीशी उभा राहिल्याने डॉ योगेश क्षीरसागराना फळ अखेर मिळालेच.





डॉ योगेश शिरसागर क्षीरसागर यांनी शरद पवारांची राष्ट्रवादी फुठल्या नंतर अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर डॉ योगेश भैया व डॉ सारिका वहिनी यांच्या नेतृत्वाखालील बीड शहरांमध्ये व बीड विधानसभेमध्ये आलेला आहे कमी वेळामध्ये डॉ योगेश क्षीरसागर डॉ सारिका क्षीरसागर यांनी बीड विधानसभेत शहरांमध्ये त्यांनी विकास काम केल्यामुळे त्यांना याचं फळ नक्कीच बीड विधानसभेतील जनता देणारच आहे

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे व महायुतीच्या २०२४ लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासोबत डॉ येथे क्षीरसागर यांनी खंबीरपणे उभा राहण्याची भूमिका घेतली आणि त्या भूमिका घेत असताना पंकजाताई मुंडे साठी डॉ योगेश क्षीरसागर व सारिका क्षीरसागर हे बीड विधानसभा मतदारसंघात भिजून काढला तेव्हाच त्यांच्या विजयाचा गुलाल डॉ योगेश क्षीरसागर यांना लागल्याची चर्चा लोकांमध्ये अकॅड मिळत होती तर पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांनी अखेर योगेश क्षीरसागर यांना न्याय दिल्यामुळे विधानसभेतील जनतेकडून त्यांचे कौतुक होत आहे

बीड विधानसभेमध्ये योगेश क्षीरसागर यांचे आता विजयाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे बीड विधानसभेमध्ये क्षीरसागर यांना चांगली पसंती मिळत असताना आता विरोधकांची धास्ती या ठिकाणी वाढलेली आहे विरोधक आता नेमकी काय भूमिका घेत आहेत याकडे लक्ष आहे परंतु योगेश शिरसागर यांना किती जरी विरोध झाला तर बीड विधानसभा मतदारसंघत विजय निश्चित मानला जात आहे.





## नारायण गड, ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर लागले कामाला

बीड (प्रतिनिधी)

उमेदवारी अर्ज वैध ठरलेले महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. ठिकठिकाणी नागरिकांनी त्यांच्या उमेदवारीचे स्वागत केले असून ते ताकदीने कामाला लागले आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांसमवेत बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नारायण गडावरील नगद नारायण महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच, शहरातील कंकालेश्वर मंदिर, शहेंशावली दर्गा, खंडेश्वरी मंदिर, राजुरी न. येथील नवगण गणपती या ग्रामदैवताचे दर्शन घेतले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महाराणा प्रताप, महात्मा बसवेश्वर, संत गाडगे बाबा, क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राजमाता जिजाऊ, वसंतराव नाईक पुतळा भगवान बाबा चौक, वीर सावरकर, यशवंतराव चव्हाण, स्व.द्वारकादास मंत्री या महापुरुषांसह छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण परिसरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी ठिकठिकाणी त्यांच्या स्वागतासाठी नागरिकांसह कार्यकर्त्यांची गर्दी दिसून आली.




## बीडमधील आमदार समर्थकांचा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटात प्रवेश

बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभा मतदार संघाची निवडणूक जाहीर होताच बीड शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या गटात प्रवेश केला. त्यामुळे कार्यकर्त्यांचा मोठा संचय क्षीरसागर गटात होत आहे. अनेक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे माजी मंत्री क्षीरसागर गटात प्रवेश केला. यंदाच्या विधानसभा निवडणूकीमध्ये माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या विजयाची खात्री असल्यामुळेच काल उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतरही शहरातील विविध भागातील मातब्बर कार्यकर्त्यांचा यात समावेश आहे.

मोमीनपुरा कुरेशी मोहल्यातील इरफान कुरेशी, सत्तार कुरेशी, खुद्दूस कुरेशी, मोईनोद्दीन मौलाना, गुड्डू भाई चाऊस, शेख मुस्ताक, सय्यद सादेक तसेच बीड शहरातील बालेपीर भागातील अक्सा कॉलनी येथील शेख अमन, अर्शान खान, शेख नुमान, शेख फुरखान, मोमीन काशीफ, शेख रिजवान, जुबेर चाऊस, अजमेर नगर भागातील मैनु मौलाना, गुड्डू चाऊस, सलीम खान, शेख सोहेल, शेख सादेक, सुफीयान खान, मोहसीन सर, वसीम टेलर, शेख आफताब, शेख शहेबाज, शेख हारूण, शेख फीजान, मुजम्मील इम्रान यांच्यासह शाहु नगर भागातील सय्यद नगर, पांगरी रोड येथील सय्यद मजहर उर्फ राजू यांचा इसा भैय्या चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो कार्यकर्त्यांचाही प्रवेश झाला.गेल्या पाच वर्षात विद्यमान आमदारांनी आम्हाला केवळ झुलवत ठेवले, कुठलिही विकास कामे न केल्यामुळे अभ्यासू आणि जाणते नेतृत्व म्हणून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटात प्रवेश केला. त्याचबरोबर यंदाच्या विधानसभा निवडणूकीमध्ये माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांना प्रचंड मतांनी निवडून आणण्याचा निर्धार या कार्यकर्त्यांनी केला.



# सव्वा रुपयाचा अब्रूनुकसानीचा दावा मुंदडावर देणार !

## रोहन गलांडे पाटील, मदनलाल परदेशी यांनी म्हटले आहे

केज (प्रतिनिधी)

केज मतदार संघात सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा यांनी गेल्या वर्षभरात जे कांड आणि कारस्थान केले त्यात उंदरी येथील संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे समर्थक सेवक यांना अरे रावी ची भाषा करणे तसेच मतदार संघातील जनतेची सत्य बाजू मांडणारे पत्रकार रोहन गलांडे यांच्यावर केज येथे खोट्या केसेस करणे धमक्या देणे हे सत्र सातत्याने चालू आहे याला वैतागून माननीय न्यायालयात रोहन गलांडे त्यांच्यावर अब्रू नुकसानीचा सव्वा रुपयाचा दावा करणार आहे तसेच अंबाजोगाई येथील जोगाईवाडी येथील शिवसेना नेते उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे



विधानसभा प्रमुख व माजी तालुकाप्रमुख यांनी वरपगाव येथील पार्वती बाई जगताप यांना सहकार्य केल्यामुळे जोगाईवाडीचे सरपंच पती राष्ट्रीय यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घेणारे बालासाहेब दोडतले यांनी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनला मदन परदेशी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला की मदन परदेशी वर नंदकिशोरजी मुंदडा साहेब शंभर कोटी रुपयाचा अब्रूनुकसानीचा दावा व शंभर कोटी रुपयांचा दावा असा दोन्ही मिळून दोनशे कोटी रुपयाचा दावा दाखल केला आहे असे म्हटले आहे म्हणून दोघांवर मदनलाल परदेशी वर खोटी केस दाखल केली म्हणून सव्वा रुपयाचा दावा दाखल करणार असे मदन परदेशी यांनी सांगितले मागे महापुरुषांच्या सोबत ग्रामपंचायत जोगावाडी कार्यालयात मध्ये मुंदडा कुटुंबाचे फोटो लावले होते त्याच्यावर आवाज उठून महापुरुषाच्या शेजारी लावलेले फोटो काढण्यास भाग पाडले त्यावर त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्याला सांगून ऑनलाइन व पोस्टर द्वारे मदन परदेशी व त्याची साथीदार ही खंडणी मागत असल्याचे तक्रार केली असेच खोटे नाटे गुन्हे दाखल करीत आहेत सत्तेचा दुरुपयोग करून सामाजिक कार्यकर्त्यांना वेठीस धरणे त्याची गळचीपी करणे व मुस्कटदाबी करणे हा शेठजीचा हातखंडा आहे असेच नाना प्रकारचे उद्योग ते करत असतात या सर्व प्रकाराला वैतागून मदन परदेशी व रोहन गलांडे पाटील त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केल्यामुळे ते फार गरीब आहेत म्हणून सव्वा रुपया दंडाची आकारणी करण्याचा दावा करण्याच्या तयारीत आहोत असे मदनलाल परदेशी व रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.



पाटोदा(प्रतिनिधी)

आदरणीय पप्पू कागदे साहेब यांचा मार्गदर्शनाखाली व आदरणीय नानाभाऊ भिसे साहेब यांचा आदेशा नुसार आष्टी विधानसभा मतदार संघात लहुजी शक्ती सेना आणि ठझख (-) आठवले गटा तर्फे मा. उमेश भाऊ क्षिरसागर यांनी आज दि.२९/१०/२०२४ रोजी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्या नंतर इंजिनिअर उमेश भाऊ क्षिरसागर हे माध्यमांशी बोलताना म्हणाले की बीड जिल्ह्यात दलित समाजाला विचारात घेतलं जात नाही आमचे नेते मा. पप्पू कागदे साहेब यांना महायुती मधे केज मतदार संघ सोडला जावा असा बीड मधील सर्व दलित समजाचा आग्रह होता परंतु महायुतीने ती जागा इगझ ला सोडली त्यामुळे दलित समाजात महायुती विरोधात रोष आहे आणि हा रोष मी आज आष्टी मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरून व्यक्त करत आहे तरी दलित समाज मला मतदार संघात भरभरून प्रतिसाद देवून मतदान करणार आहे व मीच पुढील आष्टी मतदार संघाचा आमदार असणार आहे असे मत व्यक्त केले.

# बदामराव पंडित हेच गोरगरिबांचे सच्चे नेते म्हणत कुंबेजळगावच्या कार्यकर्त्यांची २४ तासात घरवापसी

## गेवराईत राष्ट्रवादीचे नेते तोंडघशी पडले

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई विधानसभा मतदारसंघात पंडित विरुद्ध पंडित अशीच विधानसभेला लढत होणार असल्याने, या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अमरसिंह पंडित यांनी शिवसैनिकांना आपल्या पक्षात प्रवेश दिल्यानंतर अवघ्या २४ तासात कुंभेजळगाव येथील ग्रामपंचायत सदस्य सौ सोनिया कांबळे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह पुन्हा बदामराव पंडित हेच सच्चे गोरगरिबांचे नेते म्हणत, शिवसेनेत घरवापसी केली आहे. यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांवर तोंडघशी पडण्याची वेळ आली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, गेवराई विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते बदामराव पंडित यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळाली आहे. तर विजयसिंह पंडित यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून महायुतीची उमेदवारी मिळाली आहे. भाजपचे विद्यमान आमदार लक्ष्मणराव पवार हे अपक्ष निवडणूक लढत असले तरी या दोन पंडितांमध्येच यावेळी विधानसभेची खरी निवडणूक होणार असल्याचे आता बोलले जात आहे. त्यामुळे मतदारसंघातल्या कार्यकर्त्यांची पळवा पळवी सुद्धा महायुतीकडून होताना दिसते. दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी कुंभेजळगाव येथील ग्रामपंचायत सदस्य सौ सोनिया समाधान कांबळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आनंदही व्यक्त केला. परंतु अवघ्या २४ तासात कुंबेजळगाव ग्रामपंचायत सदस्य सौ सोनिया समाधान कांबळे यांच्यासह समाधान कांबळे, बाळू कांबळे, उद्धव कांबळे, ज्ञानेश्वर पगारे, महारुद्र लेंडगुळे, शहादेव लेंडगुळे, गणेश पांगरे, युवराज लेंडगुळे, दगडू पाटोळे, अर्जुन पांगरे आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना जिल्हा समन्वयक तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात पुन्हा घर वापसी केली आहे. बदामराव पंडित हेच खरे गोरगरिबांचे नेते आहेत, त्यामुळे त्यांना आमदार करण्यासाठीच आम्ही प्रयत्न करणार आहोत. आम्हाला खोटे बोलून घेऊन गेले आणि आमचा राष्ट्रवादीत प्रवेश झाल्याचे दाखवले असा आरोप या प्रवेशकर्त्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. आम्ही बदामराव पंडित यांचेच कार्यकर्ते असून शेवटपर्यंत त्यांच्या सोबतच राहणार असल्याचा विश्वासही या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

याप्रसंगी माजी सभापती युधाजित पंडित, माजी नगर उपाध्यक्ष अमोल करांडे, शिवसेना किसान सेल तालुका प्रमुख सतीश सपकाळ, उपसरपंच सुभाष राठोड, ग्रामपंचायत सदस्य धर्मराज लेंडगुळे, भाऊसाहेब माखले, बदाम पौळ, अन्सारी भाई, सुदाम लेंडगुळे, करण पांगरे, बळीराम पांगरे, बबन राठोड, शामराव कांबळे, नारायण कांबळे, भास्कर कांबळे आदींसह शिवसैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# किल्ले महादुर्गात धारूर येथे जागर प्रतिष्ठानचा दीपोत्सव साजरा



किल्ले धारूर / प्रतिनिधी

धारूर येथील ऐतीहासीक महादुर्गावर जागर प्रतिष्ठाणचे वतीने सलग पाचव्या वर्षि दिपावलीचा पहीला दिवा छत्रपती शिवाजी चे पावनभुमीत लावूनदिपोत्सव साजरा करण्यात आला सर्व ऐतीहासीट किल्ला दिव्याचे झगमगाटाने लखलखून गेला होता. या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे

बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा असलेल्या धारूर येथील महादुर्ग गडावर जागर प्रतिष्ठान च्या वतीने भव्य दिव्य असा दीपोत्सव साजरा करण्यात आला ,गेल्या चार वर्षांपासून जागर प्रतिष्ठान या ठिकाणी दिपोतस्व साजरा करत आहे.५००० दिव्यांचा आणि मशालीच्या प्रकाशाने गड उजलुन निघाला होता पोवाडे व शिवगीतांनी वातावरण अत्यंत शिवमय झाले होते जागर प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले ,कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आयुष्यमान भारत चे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे , शौर्य प्रतिष्ठान चे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील,नारायण डक,राम शेठ राठोड,स्वराज्य पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य चंद्रशेखर दादा कदम , सूरज जयभाये, स्वप्नील वरपे, सुरेश गवळी, मोहन भोसले, बालाजी चव्हाण, विजय निर्मळ बंडू खांडेकर आदी मान्यवर उपस्थित होते तसेच जागर प्रतिष्ठान च्या सर्वच शिलेदारांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रचंड कष्ट घेतले सोहळ्यासाठी जागर प्रतिष्ठान चे एक हजार हून अधिक शिलेदार उपस्थित होते

# धारूरात महविकास आघाडीत बिघाडी ; कार्यकर्ता बैठकीत वायरल पोस्टरवर शिवसेना, युवासेना पदाधिकाऱ्यांचे फोटो गायब

## अंन्याय होणार असेल तर न्यायासाठी वेट अँड वॉचच्या भूमिकेत राहू - रोहित फावडे

किल्ले धारूर / प्रतिनिधि

विधानसभा निवडणुकीचे वारे जोमाने वाहू लागले असल्याने इच्छुक उमेदवार गाव बैठका, कार्यकर्ता मेळावा, विविध माध्यमातून चर्चासत्राचे आयोजन करत आहेत त्याच अनुषंगाने माजलगाव मतदार संघात महाविकास आघाडी व माहायुती तसेच इच्छुक अपक्ष च्या उमेदवारात निवडणूक रंगली जात आहे.माहाविकास आघाडीत मित्र पक्ष काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट व इतर मित्र पक्ष या मित्रपक्षांची महाविकास आघाडी आहे. तसेच महायुती मध्ये भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, व मित्र पक्ष अशी मित्र पक्षांची महायुती आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप तर महायुती चे उमेदवार प्रकाश दादा सोळंके हे आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ कार्यकर्ता मेळावा धारूर येथे दि.३० बुधवार रोजी आयोजित करण्यात आला असुन त्यात आघाडीतल्या मित्र पक्षांना सोबत न घेता वायरल होत असलेल्या पोस्टरवरती शिवसेना जिल्हाप्रमुख तसेच शिवसेना, युवासेना धारूर या पदाधिकाऱ्यांचे फोटोच नसल्याने महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचं दिसत आहे.



पदाधिकाऱ्यांचे फोटो नसल्याने मोठया प्रमाणात माजलगाव मतदारसंघात नाराजीची चर्चा रंगू लागली आहे शिवसैनिक, हि नाराज झाल्याने मीडियावर नाराजीच्या पोस्ट दिसताहेत.या याबाबत अधिक माहिती अशी की खा. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्या उपस्थितीत धारूर येथे आज कार्यकर्ता मेळावा घेण्यात येणार असुन मेळावा होण्याआधीच आघाडीत बिघाडी झाल्याने धारूर येथील शिवसैनिक या मेळाव्यात उपस्थित राहणार नसल्याच युवासेना शहरप्रमुख रोहित फावडे यांनी प्रसिद्ध पत्राद्वारे सांगितलं.या वेळी बोलताना धारूर युवसेना शहरप्रमुख रोहित फावडे यांनी घडलेल्या प्रकाराबाबत वरिष्ठांची माहिती देणार असून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मार्गदर्शक, श्री.परमेश्वर सातपुते सर यांना व धारूर शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब मामा सराफ व युवासेना तालुकाप्रमुख रोहित भैया फावडे यांच्याशी घडलेल्या प्रकारबाबत चर्चा करून न्यायासाठी वेट अँड वॉच च्या भूमिकेत राहणार असल्याचं युवासेना शहरप्रमुख रोहित फावडे सांगितले.

# विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चौसाळा शहरात पोलिसांचे पथसंचलन

चौसाळा (प्रतिनिधी)

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानाच्या तारखा जाहीर असुन पुढील काळात राजकीय पक्षाकडुन शक्तीप्रदर्शन आणी प्रचाराला वेग येणार आहे.या अनुषंगाने राजकीय नेते मंडळीकडुन आरोप प्रत्यारोपांच्या फैरी देखील झडणार आहेत या अनुषंगाने लोकशाहीचा हा सोहळा शांततेच्या मार्गाने यशस्वी करण्यासाठी बीड पोलीस यंत्रणा सज्ज झाली असुन कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहावी याकरिता पोलिसांचे पथसंचलन करण्यात येत माहीती पोलिस अधिकारयाकडुन देण्यात येत आहे. या अनुषंगाने चौसाळा शहरात नेकनुर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली




पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,पो,हे,बालासाहेब ढाकणे,सानप,बागंर,चौसाळा पोलीस चौकीचे ठाणे अमलदार नारायण खटाणे,पो,हे,मुरूमकर, पो,ना,घुले पोलिसांनी पथसंचलन केले यात २ अधिकारी व २० अमलदार तसेच बीएसएफ चे २ अधिकारी व ३८ जवान आणी आरसीपीचे२५ कर्मचारी सहभागी झाले होते संपुर्ण चौसाळा शहरातुन पथसंचलन पुर्ण झाले.



२३२-केज विधानसभा आझाद समाज पार्टीचे पुरस्कृत अपक्ष उमेदवार आशिष अशोक भालेराव यांचा आज दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करताना आझाद समाज पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष आशिष चव्हाण रेहान मिर्झा, अशोक वाघमारे, अक्षय भालेराव अॅड. सदानंद वाघमारे सह केज तालुक्यातील समर्थक उपस्थित होते.

# संजय भाऊ दौंड पूर्ण ताकतीने धनंजय मुंडेंच्या पाठीशी - संयुक्त पत्रकार परिषदेत दिली माहिती

## माझ्यात आणि संजय भाऊंमध्ये कोणतेही मतभेद किंवा मनभेद कधीच नव्हते - धनंजय मुंडे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या पाठीशी सर्व ताकदीने उभे राहण्याचा निर्णय घेतला असुन, ते आजपासूनच धनंजय मुंडे यांच्या प्रचारात सक्रिय होणार असल्याचे आज धनंजय मुंडे व माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी आज संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले आहे.माजी आ.संजय भाऊ दौंड हे विधानसभा निवडणुकीत इच्छुक असून, ते धनंजय मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवतील का, या चर्चेला आता पूर्णविराम लागला आहे.२०१४ व २०१९ या दोनही विधानसभा निवडणुकीत आम्ही दोघे सोबत होतो. एकदिलाने आम्ही एकत्र काम केले. २०१९ च्या निवडणुकीत मी विजयी झालो, त्यात संजय भाऊंचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यानंतर संजय भाऊंना पण विधानपरिषद सदस्यत्वाची संधी मिळाली. आता पुन्हा मी विधानसभा निवडणुकीत सामोरा जात आहे, तेव्हा संजय भाऊ हे पूर्ण ताकदीने माझ्या सोबत आहेत, याचा मला मनापासून आनंद आहे, असे धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे. आगामी काळात पक्ष संजय भाऊंना



आणखी उत्तम संधी मिळवुन देईल, असा विश्वासही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. धनंजय मुंडे हे माझे बंधू आहेत. मागच्या आठवड्यात मी माझ्या सहकाऱ्यांशी चर्चा केली आणि आज धनंजय मुंडे यांच्या पाठीशी उभा राहण्याचा निर्णय मी जाहिर करत आहे. धनंजय मुंडे यांची ही निवडणूक ही माझी निवडणूक आहे, असे समजून मी पूर्ण क्षमतेने प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे माजी आ.संजय दौंड यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# बोलघेवडे नेते उदंड झाले पण शेतकऱ्यांची दैना फिटेना ; मातोश्री पाणंद रस्ते नावालाच; जिल्हा प्रशासनाकडुन दिशाभूल :- डॉ.गणेश ढवळे

**बीड: शेतवस्त्या आणि पाणंद रस्त्यांची बीड जिल्ह्यात मोठी समस्या असुन पावसाळ्यात ग्रामस्थांना गुडघ्याईतका चिखल तुडवत मुलांच्या शाळा,दुधदुभती, बाजारहाट,बि -बियाणे,शेती मालाची आवक जावक आदी दळणवळणाची साधने म्हणून सदरील कामे मातोश्री शेत/ पाणंद योजनेंतर्गत करण्यात येणार आली असल्याचा सरकारकडून गाजावाजा केला जातो. मात्र शेतकऱ्यांची दैना फिटत नसुन शेतकऱ्यांविषयी कणव दाखवणारे उदंड नेत्यांच्या नाकर्तेपणामुळे शेतकऱ्यांची दैना फिटत नसुन त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असुन शेतकऱ्यांमध्ये तिव्र नाराजी आहे. बालाघाट वरील शेतकऱ्यांनी बहुतांश रस्ते लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी यांच्या अनास्थेमुळे लोकवर्गणीतून केले असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले.**

सध्या कांदा आणि ज्वारीला खत टाकण्यासाठी लिंबागणेश येथील कृषी दुकानातुन घेऊन जात असताना खराब रस्त्यामुळे बैलगाडी चिखलात फसली. गाडीतील खत खाली उतरवुन भावाला बोलाऊन चिखलातून गाडी काढली.



दरवर्षी पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून ये जा करताना त्रास होतो. पुढारी लोकं निवडणूक आली की करतो म्हणतेत नंतर कोणीही लक्ष देत नसल्याची खंत आण्णासाहेब बाबासाहेब ढास शेतकऱ्यांनी बोलुन दाखवत तिव्र नाराजी व्यक्त केली.

बीड जिल्ह्यात २४९६ रस्ते मंजुर केलेले असुन एकुण २८७५ किलोमीटर रस्त्याचे काम करण्यात येणार असल्याचे बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून प्रसारमाध्यमांना दिशाभूल करणारी माहिती पुरविण्यात आली होती.राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने एक आदेश काढुन राज्यातील पाणंद रस्त्यांना दर्जावाढ देण्याचा घेतलेला निर्णय जरी स्वागतार्ह असला व त्यासाठी जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समितीचा वित्त आयोगाचा निधी मिळण्याचा मार्ग मोकळा असला तरी बीड जिल्ह्यामध्ये अडीच हजार पाणंद रस्ते आतापर्यंत करण्यात आल्याची प्रसारमाध्यमांना दिलेली माहिती दिशाभूल करणारी आणि खोडसाळ पणाची असल्याचे आढळून आले आहे. केंद्र सरकारने मोबाईल मॉनिटरिंग अपने हजेरी सुरू केल्याने सदरील सार्वजनिक कामांसाठी दिवसातुन दोनदा मजुरांचे फोटो काढवे लागत असल्याने कामावर मजूर दाखवणे अवघड झालेले आहे.त्यामुळे मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे रखडलेली आहेत आणि नाईलाजाने ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून कामे करण्यास सुरुवात केली आहे.




## परळी विधानसभा ऑल इंडिया पँथर सेनेचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल - गौतम आदमाने

परळी (प्रतिनिधी)

परळी विधानसभा २३३ ऑल इंडिया पँथर सेनेचे अपक्ष उमेदवार गौतम आदमाने यांचा उमेदवारी अर्ज दाखल सर्व महापुरुषांना अभिवादन करून ऑल इंडिया पँथर सेना परळी तालुक्यातील सर्व समाज बांधव कार्यकर्ते कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये अर्ज दाखल करण्यात आला. हा उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी संपूर्ण परळी विधानसभा मतदारसंघातून हजारो कार्यकर्ते उपस्थित होते त्यामध्ये ऑल इंडिया बँक सेनेचे युवक तालुका अध्यक्ष धम्मपाल भुतके परळी तालुका संघटक ऋषिकेश इंगळे युवा तालुका अध्यक्ष संघटक प्रल्हाद पंडित तालुका उपाध्यक्ष विकास व्हावळे तालुका युवा शहर उपाध्यक्ष यस बचाटे अधिक कार्यकर्ते समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते परळी विधानसभा ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्या नेतृत्वाखाली परळी विधानसभा मतदारसंघातील गौतम आदमाने हे रिंगणात उतरले आहेत यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट असे फराडे धनशक्ती विरुद्ध अशी लढत या परळी मतदारसंघात होणार आहे तरी गौतम आदमाने हे गरीब कुटुंबामधील असून हे नात्रा येथील रहिवासी असून यांनी परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचे ठरवले आहे.

# वर्षावासा नंतर भिक्खू गावो गावी जाऊन बहुजन हिताय बहुजन सुखाय धम्म प्रसार करतात



भंते शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र महास्थवीर

बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजीनगर पालन रोड बीड व भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ /१०/२०२४ रोजी वर्षावास व बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ वाचन सांगता समारोपा निमित्त पूज्य भंते शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र महास्थवीर (नालंदा बुद्ध विहार नागेवाडी जालना) यांना आमंत्रित करण्यात आले होते, पूज्य भंते यांच्या उपस्थितीत दिलीप नगर ते बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजी नगर बीड पर्यंत भव्य अशी धम्म रॅली काढण्यात आली त्यानंतर पूज्य भंते व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून ध्वजवंदना घेण्यात आली, त्यानंतर तथागत गौतम बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूज्य भंते यांचे बलभीम नगर महिला मंडळाकडून पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले या कार्यक्रमासाठी आयुष्यमान डोंगरे नाना ,प्रशांतजी ,वासनिक, अनुरथजी वीर फौजी, कमलबाई वडमारे यांची प्रमूख उपस्थिती लाभली होती, त्यानंतर बीड रेल्वे स्टेशनला नाव देणाऱ्या भीमसैनिकांचे बलभीम नगर बुद्ध विहार संघर्ष समितीकडून पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले त्यानंतर पूज्य भंते यांनी वर्षवास व बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ वाचन सांगता समारोपानिमित्त धम्मदेसणा देताना सांगितले की आश्विन पौर्णिमा म्हणजे अस्सयुज मासो पुन्नती वर्षा संपल्यावर भिक्खू संघाचा वर्षावासही संपन्न होतो आणि भगवान बुद्धांनी सांगितल्या प्रमाणे भिक्खू गावो गावी बहुजन हिताय बहुजन सुखाय धम्म प्रसार करतात अश्विनी पौर्णिमेलाच कोजागिरी पौर्णिमा, शरद पौर्णिमा म्हणतात.याच दिनी श्रद्धावान उपासक भिक्खू संघाला आवश्यक वस्तू दान करतात अश्विनी पौर्णिमेस गोड खीर दान करतात,पवित्र शांत अश्या पौर्णिमेस उपासक उपोसथ करतात.१ शील, दहा पारामिता, अष्टांग मार्ग धम्म अभ्यास करतात.२ विपश्यना, मैत्रिकरूना भाव , सम्यक समाधीचा अभ्यास करतात.३ विहारात जाऊन भगवान बुद्धांना वंदन करतात.४ दिवसात एकदाच जेवण करतात .५ कठीण चिवर दान आज केले जाते.त्यानंतर पूज्य भंते यांनी मल बलभीम नगर येथे धम्म ग्रंथ वाचन करणाऱ्या ड तेजस वडमारे, अंजली विशाल वडमारे, कोमल ताई वाघमारे, अंजली तेजस वडमारे यांचा सत्कार करून धम्माचा प्रचार आणि प्रसार करणे म्हणजे सर्वात मोठे धम्मदान आहे असा मोलाचा संदेश देउन धम्मदेशना संपन्न केली. त्यानंतर बलभीम नगर बुद्ध विहार कमिटी कडून भोजनदान व खिरदान करण्यात आले, या कार्यक्रमासाठी सिद्धार्थ वडमारे, गौतम खेमाडे,ड तेजस वडमारे, अंजली विशाल वडमारे, कोमल ताई वाघमारे, स्वातीताई वडमारे, अंजली तेजस वडमारे , सरीता खेमाडे,अंकिता वडमारे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली या कार्यक्रमासाठी हेमाबाई वडमारे, सोनाली अंकुटे , वर्षा खेमाडे, आशा धनवे, हौसाबाई वाघमारे, पुनम शिंनगारे, सारिका खेमाडे, अर्चना जाधव, प्रीती जाधव, दिपाली जाधव, साधना खेमाडे, जानवी वाघमारे, शकुंतला ससाने मॅडम, पूजा वाघमारे, आचल वडमारे, माधवी साळवे, वीर ताई, आशा भालेराव, पंचफुला वाघमारे, फुलामाय इंगळे, आरोही अंकुटे, संगीता जाधव,निवृत्ती वाघमारे, इंदर वाघमारे, नागेश साळवे, आर्यन साळवे, अक्षय जोगदंड, प्रेम जोगदंड, जय जाधव, अभिजीत जाधव, सचिन खेमाडे, अशोक गायकवाड, शशी गवळी, चेतन जाधव सिद्धार्थ साळवे, व बलभीम नगर दिलीप नगर शिवाजीनगर परिसरातील सर्व बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका सहपरिवार उपस्थित होते.

# गेवराईत वंचित बहुजन आघाडीचा महाएल्गार; प्रियंका ताई खेडकर यांनी भरला उमेदवारी अर्ज

## गेवराईकरांना विकास काय असतो हे दाखवून देईल - प्रियंका ताई खेडकर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : विधानसभा निवडणुकीसाठी बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवार प्रियंका खेडकर यांनी आज मंगळवार दि.२९ ऑक्टोबर रोजी आपला उमेदवारी अर्ज सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन तसेच सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केला आहे. गेवराईत वंचित बहुजन आघाडीचा महाएल्गार पाहून विरोध उमेदवारांना धडकी भरली आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघात जनतेच्या हक्कासाठी आणि विकासासाठी तसेच तळागाळातील गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी वंचित बहुजन आघाडीकडून प्रियंका खेडकर या विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. तसेच वंचित बहुजन आघाडीने गेवराई विधानसभा मतदारसंघात तगडा उमेदवार दिल्याने आजी-माजी आमदारांची डोके दुखी वाढणार आहे. मतदारसंघात असलेली परिस्थिती त्या परिस्थितीला बदल घडविण्यासाठी मायबाप जनतेच्या आशिर्वादाने आणि सहकार्याने एक नवी उर्जा निर्माण करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवार प्रियंका खेडकर यांना बहुमताने विजयी करून विधानसभेत पाठवण्यासाठी सर्व जाती धर्माच्या लोकांनी तसेच सर्व सामान्य जनता आणि कार्यकर्ते हे एकवटले आहेत. विशेष म्हणजे गेवराई तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या चकलांबा ग्रामपंचायतीच्या सरपंच आहेत. त्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या असून



त्यांचा राजकारणात मोठा दबदबा आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघातून प्रियंका खेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने गेवराई विधानसभा मतदारसंघाचे राजकीय समीकरणे बदलणार असून प्रमुख विरोधी उमेदवारांसाठी आता डोकेदुखीचा विषय राहणार आहे. गोरगरीब सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांवर जागर करून त्यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरण्यासाठी प्रियंका खेडकर या अग्रेसर असतात. त्यांच्या या कार्यामुळे आणि विकास कामामुळे प्रियंका खेडकर यांची ओळख मतदारसंघात कार्यसम्राट म्हणून झाली आहे. आपल्या कामाच्या आणि विकासाच्या मुद्यावरून गेवराई विधानसभा मतदारसंघात त्यांचे नाव झाले असून, त्यांनी डायरेक्ट गेवराई मतदारसंघातून विधानसभा निवडणुक लढवण्याचा निर्णय घेतला आणि त्यांना वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी मिळाली. उमेदवारी मिळताच कामाला लागून आज सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन आणि सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.



**आष्टी,पाटोदा,शिरूर मतदारसंघातून माजी जिल्हा परिषद सदस्य रवि काका ढोबळे यांनी अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला यावेळी भास्कर घोरपडे,आजिनाथ महाडिक,गणेश गुंजाळ, काकासाहेब कर्डिले,वसंत चव्हाण, छगन कर्डिले, विठ्ठल खाडे, मच्छिंद्र सावंतफुले, याप्रसंगी टिपलेले छायाचित्र**

# गेवराईकरांना विकास काय असतो हे दाखवून देईल - प्रियंका ताई खेडकर

सहा गावच्या १५० कार्यकर्त्यांचा प्रवेश

गेवराई (प्रतिनिधी)

महाविकास आघाडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटक भाऊसाहेब माखले, रिपाईचे संघटक मोहनराव वक्ते, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते रुद्रा मते यांच्यासह सहा गावच्या १५० कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. यामुळे भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मोठे खिंडार पडले आहे.

गेवराई येथील शिवसेना भवन येथे झालेल्या प्रवेश सोहळ्यात महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली मिरगाव येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटक भाऊसाहेब माखले जातेगाव चे रिपाई संघटक मोहनराव वक्ते शहाजानपूरचे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते रुद्रा मते यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य अण्णासाहेब बोंद्रे, सोनाजी टकले, अशोक उमप, विकास धनवाडे, सचिन गोडबोले, बाबासाहेब खरात, बंडू खरात, महादेव पराड, विशाल शिंदे, लक्ष्मण शिंदे, महादेव गवते, किशोर मते, महेश मते, ज्ञानेश्वर गायकवाड, अनिल बदरे, सुंदर वक्ते, नंदू वक्ते, समाधान वक्ते, मनीष निसर्गंध, विठ्ठल पटेकर, प्रदीप वक्ते, सुरेश पवार, समाधान खंडागळे, सचिन कारके, लखन खरात, पवन कारके, कल्याण पवार, ईश्वर कांबळे, सुंदर बनसोडे, जालिंदर जाधव, मुकेश खंडागळे, अर्जुन पटेकर, लक्ष्मण पटेकर, प्रसाद वक्ते, परमेश्वर खरात, दत्ता भिंगले, शिवाजी भिकारी आदींसह मिरगाव जातेगाव शहाजानपूर बहिरवाडी रायगाव या सहा गावातील दीडशे कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यामुळे भाजप आमदार लक्ष्मणराव पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार अमरसिंह पंडित, महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या गटाला मोठे खिंडार पडले असल्याचे बोलले जाते.

या प्रवेश सोहळ्याला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी सभापती पंढरीनाथ लगड, जि प सदस्य युवराज डोंगरे, सुभाष शिंदे, युवानेते यशराज पंडित, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, राजाभाऊ खिस्ते, गोविंद जोशी, तय्यब पठाण, सरपंच दशरथ धुमक, सतीश सपकाळ, सरपंच मुकुंद बाबर, सरपंच तिवारी, गणेश चव्हाण, दादासाहेब संत, शेख शहदाद,



अन्सार भाई, कानिफनाथ नागरे, काशिनाथ आडगळे, बंडू नांद्रे, इम्रान भाई, कबीर भाई, सुलेमान भाई, सतीश जाधव, मिलिंद वाघमारे, सुरेश देवडकर, ऋषिकेश देवडकर, भक्तीदास मिठे, अशोक डाके, सुरज देवडकर, कैलास तौर, महादेव पटेकर, दत्ता भिंगारे, लक्ष्मण पटेकर, आकाश तावरे, यश कांबळे, ऋषिकेश कांबळे, विकास तावरे, पवन विट, संदीप माने, बंडू कांबळे, विशाल कांबळे, उदावंत, प्रशांत मिसाळ, राहुल हाडोळे, सचिन चिंचकर, भैय्या सुरासे आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

बीड (प्रतिनिधी)

मी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालणारा माणूस आहे. या शहराचा नाही तर जिल्ह्याचा व मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी मी प्रयत्नशिल असेल. सत्ता हे माझं अंतिम साध्य नाही तर साधन आहे. मुलभूत सुविधा पुरविणे हे माझे प्राधान्य आहे असे प्रतिपादन माजी मंत्री तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार जयदत्त क्षीरसागर यांनी केले. माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांनी मंगळवारी सकाळी ११ वाजता बीड विधानसभा मतदारसंघाचा आपला अपक्ष उमेदवारी अर्ज साध्या पध्दतीने दाखल केला. यावेळी त्यांच्या समवेत जगदीश काळे, रोहीत क्षीरसगर, हेमंत क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, अरूण डाके, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, विलास विधाते, उषा



सरवदे, अरूण बोंगाणे, मुखीद लाला, सखाराम मस्के, मनोज मस्के, राणा चौहाण यांच्यासह प्रमुख मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापुर्वी त्यांनी नवगण राजुरी येथील गणपती व श्री क्षेत्र नारायणगड येथे देव दर्शन घेऊन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, जिवा महाले, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, राजमाता अहिल्याबाई होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री संत भगवान बाबा, महात्मा बसवेश्वर, श्री संत गाडगे महाराज, महाराणा प्रताप, राजमाता जिजाऊ माँ साहेब, कृषि रत्न वंसतराव नाईक आदि महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले तसेच शहेंशाहवली दर्ग्यास चादर अर्पण केली.

राज्यात सध्या काका-पुतण्यांची लढत आख्ख्या महाराष्ट्रात चालू आहे, यात किती काका आणि किती पुतणे हे अंकगणित नाही तर केमेस्ट्री आहे. लोकांना साथ कोणी दिली, लोकांची सेवा कोणी केली हे लोकांना माहिती आहे. कोण-कोण येत आहे ते लोकांना माहित आहे. टोलवाले, मटकेवाले, दारूवाले, गुटख्यावाले, क्लब वाले, पत्त्यावाले असे अनेकजण भावी आमदार होण्याचे स्वप्न पहात आहेत असा टोलाही त्यांनी लगावला.



बीड जिल्ह्यातील तरुणांचे, शेतकऱ्यांचे, व कास्तकार यांचे उद्योगा अभावी होणारे स्थळानंतर रोकण्याचा प्रमुख उद्देश घेगून मी आब्बास मुसा शेख या निवड नुकीला सामोरं जात आहे..संक्षिप्त माहिती अशी कि बीड जिल्यातील एकूण लोकसंख्यांच्या तुलनेत ६०% तरुण हा शेती व शेती निगडित व्यवसाया करतो. २)२१% एवडा तरुण हा बांधकाम व्यसयाय व शेती व्यवसयातील मोठ्या प्रमाणातला तरुण,कोरडवाहू जमीन असणारा कास्तकार शेतकरी, बराच प्रमाणात ऊसतोड मजुरी करून आपल्या जीवनाची उपजिविका कशी बशी भागवत आहे      तरी या सर्व शेतकरी, ऊसतोड कामगार, बांधकाम कामगार व सुशिक्षित बेरोजगारांचे मुळ प्रश्न घेऊन मी सामान्य तरुण या निवडणूकीला सामोरे जात आहे..    जर मला मतदार मायबापणे मतदान रुपी आशीर्वाद दिल्यास मी बीड विधानसभा क्षेत्रासाठी व्यवसायिक, शेती व उद्योग धंद्यासाठी बीड शहरासाठी नवीन धरण बांधावे ही माझी मुळ मागणी लावून धरून त्यासाठी लागतील ते कष्ट, पाठपुरावा व आंदोलन उभारून प्रश्न मार्गी लाविल तरी आपण मला आबास मुसा शेख, आपण सेवेची संधी द्यावी ही समस्त बीड विधानसभा परीक्षेत्रातील सामान्य जनतेस माझ्याकडून साकडे..

# बीडमध्ये निवडणूक निरीक्षक (पोलीस) दाखल

## निवडणूक कामकाजाचा घेतला आढावा

बीड (प्रतिनिधी)

विधानसभा सार्वत्रीक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभुमीवर निवडणूक आयोगाकडुन निवडणूक निरीक्षक (पोलीस) म्हणून श्रीमती एस. मल्लीका सुरेश, पोलीस महानिरीक्षक, चेन्नई (तमिळनाडू) यांची नियुक्ती केली आहे. त्या काल दिनांक २९/१०/२०२४ रोजी बीड जिल्ह्यात दाखल झाल्या आहेत. निवडणूक निरीक्षक (पोलीस) श्रीमती एस. मल्लीका सुरेश यांनी काल बीड विधानसभा मतदारसंघाच्या ईव्हीएम मशीन स्ट्रॉन्ग रूम येथे भेट देवून पाहणी केली. तसेच कर्तव्यावर हजर असलेले अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सतर्क राहण्याच्या सुचना दिल्या आहेत. यावेळी बीड जिल्हा पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विश्वांबर गोल्डे हे उपस्थीत होते. त्यानंतर त्यांनी



पिंपळनेर पोलीस स्टेशन हद्दीतील घाट सावळी डडढ पॉईन्टला अचानक भेट देवुन चेक नाक्याची पाहणी केली कामकाजाचा आढावा घेतला.

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने मा. निवडणूक निरीक्षक (पोलीस) ह्या बीड जिल्ह्यातील सर्व मतदारसंघात भेटी देवुन जिल्ह्यातील निवडणूकीसाठी उपलब्ध मनुष्यबळ, आवश्यक मनुष्यबळ, कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेणार आहेत. तसेच जिल्ह्यातील डडढ व ऋडढ पथके योग्य काम करतात किंवा नाही याची खातरजमा करणार आहेत. जिल्ह्यातील निवडणूका पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक निरीक्षक यांची जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेवर करडी नजर असणार आहे.बीडमध्ये निवडणूक निरीक्षक (पोलीस) दाखल

# योग्य उमेदवार मिळत नसल्याने शरद पवारांची फोडाफोडी - श्यामसुंदर जाधव

## परळी मध्ये काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षांना शरद पवारांच्या राष्ट्रवादीची उमेदवारी

बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी फोडाफोडीचे राजकारण करताना, परळी मध्ये योग्य उमेदवार मिळत नसल्याने, काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षाला पळविण्यात आले आणि त्यांना उमेदवारी दिली. वास्तविक शरद पवार ही जागा मोठ्या मनाने काँग्रेसला सोडू शकले असते मात्र त्यांनी तसे केले नाही. शरद पवार यांच्या या भूमिकेचा बीड जिल्ह्यातील काँग्रेसच्या अनेक नेते आणि कार्यकर्त्यांकडून निषेध व्यक्त करण्यात येत असून, याबाबत योग्य निर्णय घेतला जाणार असल्याचे युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष श्यामसुंदर जाधव यांनी म्हटले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात युवा काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष श्यामसुंदर जाधव यांनी म्हटले आहे की, काँग्रेसच्या वतीने बीड जिल्ह्यामध्ये कुठलीही एक जागा सोडण्याबाबत आग्रह धरण्यात येत होता. मात्र दुर्दैवाने बीड जिल्ह्यामध्ये काँग्रेसच्या वाट्याला एकही जागा आली नाही. आघाडीमध्ये असलेले शरद पवार यांच्या वाट्याला जिल्ह्यातील पाचही जागा गेल्या. शरद पवार यांनी चार ठिकाणी उमेदवार दिले मात्र परळी मध्ये उमेदवार देताना त्यांच्याकडे माणूस नव्हता हे प्रकर्षाने समोर आले. यासाठी त्यांनी फोडाफोडीचे राजकारण करीत सरळ काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष यांनाच फोडले आणि त्यांना तिकीटही दिले. एक प्रकारे त्यांनी बाहेरच्या पक्षाचा माणूस घेऊन जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी कमकुवत असल्याचेच सिद्ध केले आहे. दुसऱ्या बाजूला ते ही जागा काँग्रेससाठी सोडून मोठेपणा दाखवू शकले असते, मात्र तेवढा मोठेपणा त्यांच्यात नाही केवळ फोडाफोडीचे राजकारण करण्यावरच ते भर देतात हे पुन्हा एकदा या निमित्ताने सिद्ध झाले आहे. सत्ता मिळवण्यासाठी आपण कुठल्याही थराला जाऊ शकतो हे पुन्हा एकदा शरद पवार यांनी दाखवून दिले असल्याचे श्याम सुंदर जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. ते पुढे म्हणाले आहेत की, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसला सहकार्य करीत नसल्याने या विधानसभा निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्ह्यातील नेते व कार्यकर्ते योग्य वेळी योग्य निर्णय घेतील असा इशाराही त्यांनी दिला आहे.दरम्यान, निवडणुकीच्या अनुषंगाने काय भूमिका घ्यायची याबाबत कार्यकर्त्यांच्या व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येत असून, त्यामध्ये योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.



# बीडमध्ये काँग्रेसचे पदाधिकारी योग्य उमेदवारालाच पाठिंबा देणार

बीड (प्रतिनिधी)

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड येथे काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यामध्ये बीड विधानसभेत विचाराच्या आणि योग्य उमेदवारालाच पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. याबाबत पत्रक काढून पदाधिकाऱ्यांनी कळविले आहे की, विधानसभेत च्या निवडणुका जाहीर झाल्यापासून काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला होता. कारण नेहमीप्रमाणे काँग्रेस पक्षाला जिल्ह्यामध्ये एक जागा सोडण्याबाबत मागणी करण्यात आली होती मात्र त्याचा विचार न करता एकही जागा सोडण्यात आली नाही. उलट काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मित्र पक्षात प्रवेशित झाले आणि त्यांनी उमेदवारी मिळवली. मित्र पक्षाची ही पद्धत पदाधिकाऱ्यांना रुचली नाही त्यामुळे प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. याच पार्श्वभूमीवर बीड येथे विविध विभागांच्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यामध्ये काँग्रेसचे विचार, संविधान वाचविणे आणि कायद्याचे राज्य चालविणे असे आपले कर्तव्य असल्याचे सांगत, या विधानसभा निवडणुकीमध्ये कुठल्या उमेदवाराच्या मागे काँग्रेसची विचार असलेले मतदान उभा करायचे याबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत योग्य उमेदवाराची लवकरच



## प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत झाला निर्णय

निवड करून त्याला काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा पूर्ण पाठिंबा राहील हे जाहीर करण्याचे ठरविण्यात आले. सदरील बैठकीला ड.राहुल साळवे,( अध्यक्ष अनुसूचित विभाग महाराष्ट्र प्रदेश ), ड.कृष्णा पंडित ( प्रदेश सरचिटणीस लीगल सेल ), अशोक बहिरवाळ ( ओबीसी प्रदेश सचिव ), ड.विद्या गायकवाड ( पंचायत राज प्रदेश सचिव ), श्यामसुंदर जाधव ( उपाध्यक्ष युवक काँग्रेस ), डॉक्टर जयप्रकाश आघाव (शहराध्यक्ष सेवादल ), ड. सज्जाद अली ( लीगल सेल बीड ), ऋषभ कोठारी ( यंग ब्रिगेड जिल्हाध्यक्ष ), ड.नितीन वाघमारे ( लीगल सेल ), वचिष्ठ बडे ( ओबीसी प्रदेश सचिव ),अरुण कांबळे ( ट्रॉसिटी समन्वयक ), ड. सुनील वडमारे ( लीगल सेल ), ड. पंकज रायभोळे ( लीगल सेल बीड ), ड. गोरक्ष खेडकर ( लीगल सेल ), भारत विद्यागर, नितीन गायकवाड, रोहित मस्के ( सेवादल ), भारत वालेकर ( उपाध्यक्ष युवक काँग्रेस बीड ), गणेश करांडे, शेख सरफराज, राहुल लोळगे, ड. पवन वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ योगेश क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

महायुतीतील बीडच्या जागेचा तिढा अखेरच्या क्षणापर्यंत सुटत नव्हता. जागावाटपात शिवसेनेच्या वाट्याला गेलेली बीडची जागा मुंडे बहीण-भावाने प्रतिष्ठापणाला परत खेचून आणली. मंगळवारी (दि.२९) मध्यरात्री १ वाजता हा तिढा सुटला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना बीड विधानसभेचा सदस्य अर्थात आमदार होण्याची संधीच प्राप्त झाली आहे.

महायुतीचे अधिकृत उमेदवार ठरलेल्या डॉ.योगेश क्षीरसागर यांनी महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे, रिपाइं कवाडे गटाचे जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे, अजय सवई, डॉ.लक्ष्मण जाधव, ड.प्रज्ञाताई खोसरे, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष सचिन जाधव, इरफान बागवान, अनिल चांदणे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा, तालुकास्तरीय पदाधिकारी, आजी-माजी जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, सरपंच, नगरसेवक यांच्यासह कार्यकर्ते उपस्थितीत होते. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले, डॉ.योगेश क्षीरसागर हे भावी नसून फिक्स आमदार आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये आ.पंकजाताई मुंडे यांचे प्रामाणिकपणे काम केल्याचे त्यांना फळ मिळेल, असे मत व्यक्त केले. तसेच, पंकजाताईंसह उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.योगेश क्षीरसागर यांना गुलाल लावल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच, मित्र पक्षाच्या जिल्हाध्यक्ष, पदाधिकाऱ्यांनी विजयासाठी शुभेच्छा देऊन ताकदीने महायुतीला सत्तेत आणू, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT